■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २७९ ■ शुक्रवार दि.२७ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 279 ■ Friday Dt.27 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# आरोपीला शोधण्यासाठी पोलीस प्रशासनाने बारामती आणि आंतरवाली सराटी येथे चौकशी करावी..!

## स्वर्गीय धर्मवीर आनंद दिघे साहेब असते तर त्या विजय पवारला भरचौकात फाशी दिली असती? आनंद दिघे साहेबांच्या भूमिकेत बीड जिल्ह्यात न्याय देण्यासाठी कोण पुढे येणार?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# बीड शहरातील क्लासमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार; छत्रपती-फुले- शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात काळीमा फासणारी घटना!

## संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी लढा दिला परंतु आता या मुलीच्या न्यायासाठी लढा उभा करावा?

## अजितदादा, पंकजाताई, धनुभाऊ तुम्ही न्याय द्या, नराधमाला पकडण्यासाठी पोलिसांना आदेशित करा?

## शरद पवार,जयंत पाटील, संदीप क्षीरसागर तुमच्या संपर्कात विजय पवार कोणत्या कारणामुळे होता याचे उत्तर द्या?

## मुख्यमंत्र्याच्या व राज्य सरकारच्या लाडक्या बहिणी सुरक्षित नाहीत मग कसली पाठ थोपटत आहात जनाची नाही तर मनाची तरी बाळगा!












- विद्यमान आमदार समर्थकांच्या कहारनाम्याने जिल्ह्याच्या इतिहासात इज्जतीची मालिका लावली
- मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब तुम्ही झोपेचे सोंग घेतात का?
- बीड जिल्ह्यात एसपी नवनीत कॉवत यांच्या कायद्याचा धाक या गुंड प्रवृत्तीच्या लोकांना राहिला नाही?
- मुलींना कपडे काढायला लावणाऱ्या या विजय पवारांच्या अवघड जागेवर सळई घालायला पाहिजे ?
- शिक्षणाच्या नावाखाली अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या शिक्षकाला रस्त्यावर फटका?

बीड । प्रतिनिधी

खाजगी कोचिंग क्लासेस मध्ये 'नीट' ची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीची छेडछाड आणि लैंगिक छळ प्रकरणी दोन शिक्षकांवर पोस्को अंतर्गत बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्षकांवरच गुन्हा दाखल झाल्यानं शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विजय पवार आणि प्रशांत खाटोकर असे या दोन शिक्षकांचे नाव असून बीड शहरात हे दोघे जण खाजगी कोचिंग क्लासेस चालवतात. या दोघांकडून नीटची तयारी करणाऱ्या मुलीची छेड काढून क्लासेसच्या केबिनमध्ये लैंगिक छळ केला जात होता. घडलेला प्रकार मुलीने आपल्या मैत्रिणीला सांगितला. मात्र, शिक्षकांकडून होणारा त्रास असाह्य झाल्याने मुलीने हा संपूर्ण प्रकार आपल्या आई–वडिलांना सांगितला.

मुलीच्या आईने शिवाजीनगर पोलिस ठाणे गाठले. मुलीच्या फिर्यादीवरून दोन्ही शिक्षकांवर पोस्को अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत असून दोन्ही शिक्षक अद्याप फरार आहे. या मुलीकडून पोलिसांकडे देण्यात

पान २ वर

> संबंधित बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्राला व विद्यार्थी यांना आजच्या घटनेमुळे डाळिंबा फासल्याची घटना घडली आहे. संबंधित विजय पवारला आज राजकीय पाठबळ आहे. त्यामुळे तो अनेक राजकीय नेत्यांच्या संपर्कात आहे. त्याला अटक करण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे जाऊन निवेदन दिले. यावेळी एडवोकेट संगीता ताई तसेच सचिन उबाळे, अनुरत वीर, शिवराज बांगर, केशव तांदळे, किस्कीदाताई पांचाळ सह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी या घटनेचा निषेध केला व शासन दरबारी निवेदन आरोपीवर कठोर शासन व्हावे अशी मागणी केली.

### नार्को टेस्ट करण्याची मागणी

या विजय पवार आणि प्रशांत खटावकर यांच्या अत्याचाराला कंटाळून एक विद्यार्थिनी आणि पालक समोर आले. यामुळे हा गंभीर प्रकार उघडकीस आला. पण तो अनेक वर्षांपासून याच क्षेत्रात असल्याने त्याने असे अनेक प्रकार केले असतील. जो माणूस आपल्या मुलीच्या वयाच्या लेकराला नग्न करतो त्याची मानसिकता आणि निर्वावला हे लक्षात येते, यामुळे या ची नार्को टेस्ट करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. यापूर्वी असाच एकप्रकार याने पैसे देऊन मिटविला असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे.

### सामाजिक संताप व पालकांचा विरोध

या घटनेमुळे बीडमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, उमा किरण क्लासेसची विश्वासार्हता धुळीला मिळाल्याची भावना पालक व्यक्त करत आहेत. जिथे शिक्षकच अश्लील वर्तन करत असतील, तिथे मुलींच्या सुरक्षेची खात्री कशी द्यायची, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी कठोर नियमावली आणि चौकशी यंत्रणा उभारण्याची मागणी जोर धरत आहे.

### मुलीने दुसऱ्या सरांची मदत मागितली, त्यांनीही फायदा उचलला

मला प्रशांत खाटोकर सर यांचा बॅड टच आवडत नसायचा म्हणून विजय पवार सर यांना सांगीतले तेव्हा ते मला म्हणाले की, त्यांना आम्हीच ठेवले, मुलींना त्रास देण्यासाठी. असे म्हणून ते पण माझ्यासोबत वाईट वागायला लागले व ते मला केबिनमध्ये कोणी नसताना किस करायचे माझ्या छातीला व गुप्त अंगाला बॅड टच करायचे. ते मला सर्व मुले दुसऱ्या क्लासला गेले की, बाजूला बोलवायचे व एकटीला थांबून ठेवायचे. तेव्हा सर्व क्लासमधील मुले माझ्याकडे वाईट नजरेने बघायची. ते मला आवडत नसायचे. मी ही झालेली घटना मझी मैत्रीण आर्या पिंगळे हिला सांगितरी तेव्हा ती मला म्हणाली की, ते आपले सर आहेत आपण त्यांचा रिस्पेक्ट करायचा. त्यामुळे मला या गोष्टीचा त्रास होऊ लागल्यामुळे हा झालेला प्रकार मी माझ्या आई– वडीलांना सांगितला आणि त्यानंतर आई–वडील मला तक्रार द्यायला पोलीस ठाण्यात घेऊन आले, असे या मुलीच्या तक्रारीत म्हटले आहे.

# जिल्हाधिकारी साहेब, तुम्ही एकदा पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची कानउघडणी कराच



## देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली शासनाला लाखो रुपयाचा लावला चुना.?

टाकरवन । प्रतिनिधी

जायकवाडी धरण ते माजलगाव धरणापर्यंत उजवा कालवा गेल्यामुळे कोरडवाहू जमीन सिंचनाखाली आली. त्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनात समाधानकारक वाढ दखील झाली. परंतु दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे जायकवाडीचे धरणाची पाणी पातळी घालवल्यानंतर उजव्या कालव्यातून सुटणारे पाणी बंद झाल्याने नेहमीच उजव्या कालव्यातून वितरेकेत सोडले जाणारे पाणी बंद झाले. त्यामुळे वितरेकेची खूप मोठ्या प्रमाणावर दूर अवस्था झाली. त्यानंतर पाटबंधारे विभागाच्या वतीने देखभाल दुरुस्तीचे काम देखील करण्यात आली. मात्र ही कामे अधिकारी कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गुत्तेदाराकडून बोगसरीत्या करून घेतल्याने नेहमीच शेतकऱ्याला मिळणारे पाणी बंद झाले.

गेल्या दहा वर्षापासून अनेक शेतकऱ्याला उजव्या कालव्यामार्फत वितरेकेतून मिळणारे पाणी कायमचे बंद झाले. अशा शेतकऱ्यांना पाणी मिळत नसल्यामुळे ते शेतकरी

पान २ वर

- दोन एकर ला पाणी देऊ शकता मग तीस हेक्टरला का नाही.?
- पैसे दिल्यास वितेरेका फोडूनही पाणी मिळते मात्र नियमनुसार थेंबही मिळत नाही.?
- अधिकारी कर्मचाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे लाखो लिटर वितरेकेतून पाणी जाते वाया

## बीडचा अभिमान! फिल्मस्टार डॉ. महेश कुमार यांचे एकाच महिन्यात दोन चित्रपट प्रदर्शित

# सत्यकथा बळीराजाची.. ठिणगी संसाराची चा भव्य प्रीमियर बीडमध्ये

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या मातीत जन्मलेले आणि अभिनयाच्या जगतात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे फिल्मस्टार डॉ. महेश कुमार यांनी पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. मागील महिन्यात महाराष्ट्रभर ४०० टॉकीजमध्ये प्रदर्शित झालेला त्यांचा चित्रपट वामा लढाई सन्मानाची प्रचंड यशस्वी ठरल्यावर आता त्यांचा दुसरा चित्रपट सत्यकथा बळीराजाची.. ठिणगी संसाराची प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. विशेष म्हणजे दोन्ही चित्रपट एकाच महिन्यात प्रदर्शित होणे ही बाब मराठी चित्रपटसृष्टीसाठी ऐतिहासिक ठरावी अशीच आहे. तर पत्रकार, शेतकऱ्यांसाठी मोफत प्रीमियर शो बीडमधील संतोषीमाता टॉकीज येथे २७ जून रोजी दुपारी २.३० वाजता ठेवण्यात आला असल्याचे चित्रपटात मुख्य




भूमिका साकारणारे महेश कुमार वनवे, दिग्दर्शक फैज अहमद धुळेकर, निर्माता आरिफ शेख सांगितले. ते मंगळवारी बीडमध्ये अयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. यावेळी दैनिक सूर्योदय संपादक गंगाधर काळकुटे पाटील यांच्यासह दिग्दर्शक फैज अहमद धुळेकर, निर्माता आरिफ शेख, कॅमेरामन सत्तार शेखउपस्थित होते.

फिल्मस्टार डॉ. महेश कुमार यांचा नवीन चित्रपट २७ जूनपासून सर्वत्र प्रदर्शित होत आहे. याचा प्रथम प्रीमियर शो बीडमधील संतोषीमाता टॉकीज येथे दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. बीडमध्येच प्रीमियर शो घेण्यामागे त्यांचा स्वाभिमान आणि जन्मभूमीवरील प्रेम आहे, हे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. यानंतर हा चित्रपट दररोज दुपारी ३ वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटामध्ये वर्षा पाटील, रूपाली जाधव आणि झरणा सरकार यांच्या मुख्य भूमिका असून, सुरेश वाडकर आणि खुशबू जैन यांच्या सुरेल आवाजातील गाणी प्रेक्षकांच्या मनात घर करतील. फैज अहमद धुळेकर यांच्या दिग्दर्शनाखाली आणि आरिफ शेख यांच्या निर्मितीमध्ये साकारलेला हा चित्रपट तांत्रिकदृष्ट्या समृद्ध असून दैनिक सूर्योदय ग्रुप या डिजिटल मीडिया पार्टनरच्या सहकार्याने प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहे.

**शेतकऱ्यांचे दु:ख आणि संघर्षांची साक्ष सांगणारा चित्रपट**

सत्यकथा बळीराजाची.. ठिणगी संसाराची हा चित्रपट शेतकरी जीवन, त्यांचे संघर्ष, स्वप्नं आणि सामाजिक वास्तव यावर आधारित आहे. प्रेक्षकांना भावनिक आणि विचारप्रवर्तक अनुभव देणाऱ्या या चित्रपटात डॉ. महेश कुमार यांनी साकारलेली भूमिका अत्यंत परिणामकारक आहे.

**प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता**

मागील चित्रपटाच्या यशानंतर डॉ. महेश कुमार यांच्याबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. बीडमध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले, बीड ही माझी जन्मभूमी आहे. म्हणूनच मुंबईऐवजी बीडमध्येच माझ्या चित्रपटांचा प्रीमियर शो करणे हा माझा अभिमान आहे. शेतकऱ्यांच्या संघर्षावर आधारित हा चित्रपट प्रत्येकाने जरूर पाहावा.

**कौटुंबिक आणि सामाजिक चित्रपट रसिकांच्या पसंतीस उतरतोय**

सामाजिक जाणीवा, कुटुंबातील नाती आणि ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणारा हा चित्रपट प्रबोधन आणि मनोरंजन यांचा उत्तम मिलाफ आहे. त्यामुळे बीडसह संपूर्ण महाराष्ट्रात हा चित्रपट लोकप्रिय होण्याची चिन्हं दिसून येत आहेत.




## अनाथांच्या उपस्थितीत गजानन मारणे महाराज यांचा वाढदिवस आदर्श उपक्रमातून साजरा

बीड । प्रतिनिधी

मानवी जीवनात सेवा हा सर्वात मोठा धर्म आहे, या विचारातून बीड तालुक्यातील पसायदान प्रकल्प येथे अनाथ लेकरांना साहित्य वाटप व मिष्ठान्न देण्यात आलं. सामाजिक कार्यकर्ते गणेश गोरे यांनी गजानन मारने यांच्या वाढदिवसा निमित्त वंचितांच्या हक्काच माहेर घर असलेल पसायदान सेवा प्रकल्प येथील अनाथ मुलात वेळ घालून सेवा केली. मारणे यांना दीर्घायुष्य लाभावे व चांगली सेवा घडावी यासाठी या अनाथ जीवांचे आशीर्वाद आपण मागत असल्याचे यावेळी गोरे यांनी म्हटले.

गजानन मारने यांच्यावर प्रेम करणारे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आहेत सामाजिक सेवा करताना अनेकांनी प्रेरणा घेत त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा केला बीड येथील त्यांचे खंदे समर्थक गणेश गोरे यांनी ढेकणमोह येथील अनाथ विद्यार्थ्यांचे निवासी केंद्र पसायदान येथे शालेय साहित्य वाटप केले व मुलांना जेवण दिले. सदरील उपक्रम हा मानवी सेवेचा कर्त्यव्यभाव असून मारने साहेबांच्या दीर्घायुष्यासाठी आम्ही या अनाथ आत्म्यांचा आशीर्वाद मागत असल्याचे गोरे यांनी म्हटले यावेळी प्रकल्प संचालक श्री दराडे यांनी गणेश गोरे यांचे आभार मानले.

## सुभाषराव पवळ यांचा उद्या बीड येथे सेवापुर्ती गौरव सोहळा

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथील समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा मुख्याध्यापक सुभाषराव सुंदरराव पवळ यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा उद्या शनिवार दि.२८ जून रोजी होणार आहे. गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथील स्व. सुंदरराव पवळ यांनी स्थापन केलेल्या समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या सिरसमार्ग, परळी आणि मातोरी येथे माध्यमिकच्या शाळा आहेत. स्व. सुंदरराव पवळ यांचा वसा आणि वारसा जपत, सचिव सुभाषराव पवळ यांनी शिक्षण संस्थाचा नावलौकिक कायम ठेवला. मुख्याध्यापकपदाची जबाबदारी संभाळताना, शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले. त्यामुळे त्यांच्या हितचिंतकानी सुभाषराव सुंदरराव पवळ यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळा आयोजित केला आहे.



बीड येथे दि.२८ जून रोजी, सायंकाळी ७ वाजता हॉटेल ऑलिव येथे हा कार्यक्रम होणार आहे. गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित हे अध्यक्षस्थानी असणार आहेत तर या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार अमरसिंह पंडित, राजेंद्र जगताप, बदामराव पंडित, लक्ष्मण पवार, प्रा. सुरेश नवले, प्रा. सुनील धांडे, सय्यद सलीम, शिवसंग्रामच्या ज्योतीताई मेटे, मुप्टाचे प्रा. सुनील मगरे, अशोक डक, डॉ. योगेश क्षीरसागर, शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, राजेश खटावकर, नानाभाऊ हजारे, अजय बहीर, कृष्णा पंडित, दीपक घुमरे, शिवसेनेचे अनिल जगताप, उल्हास गिराम, राजेंद्र मस्के, सुभाष राऊत, दै. लोकाशाचे निवासी संपादक उत्तम हजारे, संपादक अजित वरपे, दिलीप खिस्ती, लोकपत्रकार भागवत तावरे, राजेंद्र मुनोत, अगंद नवले, वैभव क्षीरसागर, बी. बी. जाधव, सत्येंद्र पाटील, चंद्रकांत मुळे, सुहास पाटील, प्रा. सुशीलाताई मोराळे, सुभाष सपकाळ, अशोक हिंगे, उत्तमराव पवार, महादेव काळे, दिलीप गोरे, गणेश वाघ, संभाजी करांडे, अशोक जाधव, विश्वनाथराव मगर, जालींदर पैठणे, राजकुमार कदम, सीमा ओस्तवाल, प्रज्ञा खोसरे, कल्पना सोनवणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन गौरव समितीचे राजेंद्र केसकट, भारत मगर, संजय गोरे, भारत तांबरे व सर्व संयोजन समितीने केले आहे.

## दुचाकीला टोल लावण्याच्या प्रस्तावाला कडाडून विरोध

### मिलिंद सरपते यांनी एनएचएआयला पाठवले निवेदन

बीड । प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण द्वारे दुचाकी वाहनांवर टोल लावण्याच्या प्रस्तावित निर्णयाला विरोध करत बीड येथील सामाजिक जाणिव असलेले नागरिक मा.मिलिंद सरपते यांनी थेट प्राधिकरणास तसेच केंद्रीय मंत्री व लोकप्रतिनिधींना ई–मेलद्वारे निवेदन पाठवले आहे. सरपते यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, दुचाकी वाहन हे गरीब, मध्यमवर्गीय आणि रोजंदारी करणाऱ्या सामान्य जनतेसाठी अत्यावश्यक साधन आहे. इंधन दरवाढ, विमा आणि देखभाल यांचा बोजा आधीच मोठा असताना टोल लावल्यास नागरिकांवर अन्याय होईल.



ते पुढे म्हणाले की, महामार्गांवर दुचाकीस्वारांसाठी स्वतंत्र व सुरक्षित सुविधा नसतानाही टोल आकारण्याचा निर्णय हा केवळ उत्पन्नवाढीचा अन्यायकारक उपाय आहे. सरकारने त्वरित हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा जनतेला लोकशाही मार्गाने आंदोलनाचा पर्याय स्वीकारावा लागेल. सरपते यांनी हे निवेदन छक–ख च्या अध्यक्षांना ई–मेलद्वारे पाठवले असून त्याची प्रत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, बीडचे खासदार मा. बजरंग सोनवणे व आमदार मा. संदीप क्षीरसागर यांनाही पाठवण्यात आली आहे.

## जिल्हा परिषद माध्यमिक शाळा येथे राजश्री छत्रपती शाहू महाराजांची जयंती उत्साहात साजरी



चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथे २६ जून २०२५ रोजी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा येथे राजश्री छत्रपती शाहू महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे मॅडम व प्रमुख पाहुणे म्हणून श्री विजय कोळेकर सर, श्रीमती शालिनी काकडे मॅडम हे होते. तसेच या कार्यक्रमाला उद्धव घोडके सर व ज्ञानेश्वर मस्के सर यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता दुसरी ते दहावी वर्गातील विद्यार्थ्यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या जीवनाबद्दल मनोगत व्यक्त केले.

त्यांच्या कार्याबद्दल मुलांना अवगत करण्याचे काम कार्यक्रमाच्या अध्यक्ष पद्मजा हंपे मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनोद शिंदे व माजी अध्यक्ष नंदू बाबा जोगदंड हे सुद्धा उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता दहावी ब या वर्गाकडे केले. यामध्ये सूत्रसंचालन, प्रास्ताविक, आभार प्रदर्शन कुमारी समीक्षा चौरे, अमृता आंधळे, स्वीटी गायकवाड, अनुष्का पवार या विद्यार्थीनींनी केले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक बंधू व भगिनी उपस्थित होते. हा कार्यक्रम उत्तम करण्यासाठी शाळेचे परिचर सुरेश गोरे सर व वाळके सर यांनी सहकार्य केले.



नवगण राजुरी : श्री क्षेत्र नारायणगडाचा पालखी सोहळा आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान झाला असून गुरुवारी नवगण राजुरी येथे पालखी सोहळ्याचे व महंत शिवाजी महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेताना श्री.गजानन सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन रवींद्र क्षीरसागर, युवा नेते हेमंत क्षीरसागर आणि ग्रामस्थ.

## देशाच्या राष्ट्रपती द्रोपती मुर्मु यांनी केला पोलीस दलातील सेवेचा सन्मान

### जिल्हा पोलीस दलतील पोलीस उपनिरीक्षक संतोष वजुरकर राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलात सर्वोत्कृष्ट कार्यपद्धती इमानी ईदबारी पोलीस सेवा केल्यामुळे हा राष्ट्रपती पोलीस पदक सन्मान देण्यात आला . देशाच्या राष्ट्रपतींनी केला. बीड जिल्हा पोलीस अधिकाऱ्याच्या सेवेचा सन्मान. देशात आणि महाराष्ट्रात सर्व उत्कृष्ट पोलीस दलातील सेवा करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मान केला जातो. हा सन्मान पोलीस दलातील सर्वोत्कृष्ट पुरस्कार मानला जातो. जो पोलीस कर्मचारी आपल्या सेवेत विशेष कामगिरी आणि आपले कर्तव्य इमानदार ने पार पडतो. अशाच कर्मचाऱ्यांना हा राष्ट्रपती पदक सन्मान पुरस्कार दिला जातो.

बीड जिल्हा पोलीस दलात गेला दोन–तीन दशकापासून उत्कृष्ट सेवा केल्यामुळे बीड



जिल्हा पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक संतोष पंडितराव वजुरकर यांना हा मानाचा सन्मान यावर्षी मिळाला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात वाचक शाखा येथे सध्या ते पोलीस सेवा देत आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालय वाचक शाखा येथे कर्तव्य बजावत आहेत. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन येथे हा राष्ट्रपती पदक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

यामध्ये राज्यातील अनेक पोलीस अधिकारी कर्मचारी यांचाही समावेश होता तर बीड जिल्ह्यातून एकमेव पोलीस अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक संतोष वजूरकर यांची उपस्थिती होती. यावेळी राजभवनात राज्याचे राज्यपाल, गृह राज्यमंत्री योगेश कदम, महाराष्ट्र पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, तसेच राज्यातील विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या उपस्थित हा कार्यक्रम भव्य दिव्य स्वरूपात संपन्न झाला.वजुरकर कुटुंबातील सौ. सुवर्णमाला संतोष राजुरकर, मुलगा रवीकिरण वजुरकर, डॉ. ऋषिकेश वजुरकर यांची राजभवनात उपस्थिती होती. बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासह सर्व मित्र परिवार, नातेवाईक सहकारी पोलीस अधिकारी कर्मचारी यांनी पीएसआय संतोष वजुरकर यांचे विशेष अभिनंदन केले. व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने पावसाळी अधिवेशन पूर्वी पत्रकारांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करा : बीबी वैद्य

मुंबई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजीत पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ साहेब, क्रीडामंत्री भरणे साहेब, मा. आमदार रविंद्र धंगेकर साहेब यांची भेट झाली आहे. यांच्या कार्याला शुभेच्छा देवून, पत्रकार यांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन लोकशाही पत्रकार संघांचे सं. अ. बीबी वैद्य, प्रदेश उपाध्यक्ष पंढरी पवार यांनी दिले. या निवेदनात पत्रकारांच्या योजनांसाठी असलेल्या जाचक अटी काढून टाकाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. याच बरोबर लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य तसेंच अनेक राज्य व जिल्हा पत्रकार संघ गेल्या अनेक दिवसापासून पत्रकारांसाठीच्या विविध योजनांच्या आटी आणि नियमात बदल करावेत अशी मागणी सातत्याने करत आहे.



या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजीत पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी दखल घेऊन यात काही सुधारणा करण्याची तयारी दाखवली पाहिजे नव्हे तर अंमलबाजवणी करावी. यात काय बदल अपेक्षित आहेत. अशा सूचना करणारे निवेदन जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या मार्फत संचालक डॉ. गणेश मुळे, मुख्यमंत्री, माहिती व प्रसारण मंत्री, उपमुख्यमंत्री यांना अनेक पत्रकार संघ, लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहे. या निवेदनामध्ये पत्रकार यांना टोल माफी करावी. पत्रकार यांना पंतप्रधान आवास योजना चा विना अट देण्यात यावे. पेट्रोल मध्ये सवलत मिळावी., सर्व बस, ट्रेन, विमान प्रवासात मोफत सवलत मिळावी., कागद, शाई मोफत मिळावी., प्रत्येक तालुक्यात एक प्रिंटिंग क्लस्टर तयार करून मान्यता द्यावी., कोणत्याही कामासाठी बँक मॅनेजर ने पत्रकार यांना कर्ज तात्काळ द्यान्यात यावे असे जी आर काढणे., आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेसाठी वयाची अट ५८ वर्ष व अनुभवाची अट २५ वर्षे करावी. सलग तीस वर्षे सेवा ही अट रद्द केली जावी. ज्यांच्याकडे विना खंड सलग तीस वर्षे अधिस्वीकृती पत्रिका आहे आणि ज्यांचे वय ५८ वर्ष आहे अशा पत्रकाराला सन्मान योजनेचा लाभ दिला जावा. महाराष्ट्रात असंख्य पत्रकार असे आहेत की त्यांच्याकडे तीस वर्षांपूर्वीची कागदपत्रे मिळत नाहीत. त्यामुळे पत्रकार योजना पासून ते वंचित राहतात. अशा स्थितीत जिल्हा माहिती अधिकारी आणि जिल्हा मराठी पत्रकार संघाचे शिफारस पत्र ग्राह्य समजले जावे. शिवाय संबंधित पत्रकाराचे प्रतिज्ञापत्र घेतले जावे. पत्रकार यांना टोल माफी लवकर जाहीर करावी. अनेक साप्ताहिकाच्या प्रेस लाईन वर मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक म्हणून एकाच व्यक्तीचे नाव असते मुद्रक अथवा प्रकाशक म्हणून नाव आहे.म्हणजे तो पत्रकार अन्य व्यवसाय करतो असे नाही. ते फक्त सोयीसाठी असते. त्यामुळे प्रकाशक आणि मुद्रक म्हणून नाव असणाऱ्यांचा तो अन्य व्यवसाय आहे. असे समजू नये त्यालाही लाभ मिळावा. उत्पन्नाची अट दोन लाखावरून वाढवून ती पाच लाख करावी. सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या एखाद्या पत्रकाराचे निधन झाले तर त्याच्या पत्नीला ती हयात असेपर्यंत या योजनेचा लाभ मिळावा. पत्रकार महिला असेल तर तिच्या पश्चात तिच्या पतीला हा लाभ मिळावा. अशा सूचना करण्यात याव्यात.

याशिवाय शंकराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीबाबत काही सुधारणासाठी सूचना करण्यात आल्या आहेत. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण मुदत ठेवीतून मिळणाऱ्या व्याजातून ही योजना चालविण्यापेक्षा या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जावी. त्यामुळे पत्रकारांसाठीच्या योजनांना निधीची कमतरता भासणार नाही .शंकराव चव्हाण निधीचे जे विश्वस्त मंडळ आहे त्यांच्या बैठका नियमित होत नाहीत दर दोन महिन्यांनी या ट्रस्टच्या बैठका झाल्या तर पत्रकारांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत. आरोग्य योजनेचा लाभ देताना ठराविक आजाराची मर्यादा रद्द करून ही योजना सर्व प्रकारच्या आजारासाठी लागू करावी. अनेकदा असे आढळून आले आहे की बऱ्याच पत्रकारांचे मेडिक्लेम असतात अशा पत्रकारांना त्याची सर्व ओरिजनल कागदपत्रे विमा कंपन्यांना द्यावी लागतात. परिणामत: अशा पत्रकारांना योजनेचा लाभ मिळत नाही. अशा पत्रकारांची हॉस्पिटलची झेरॉक्स कागदपत्रे ग्राह्य धरली जावीत आणि महत्त्वाचे म्हणजे या योजनेसाठी असलेली आधिस्वीकृती पत्रिकेची अट रद्द केली पाहिजे. राज्यात केवळ आठ टक्के पत्रकारांकडेच आधिस्वीकृती असल्याने ९२ टक्के पत्रकार या अटीमुळे योजनेच्या लाभांपासून वंचित राहतात. पत्रकारांच्या मृत्यूनंतर किमान पाच लाख रुपयांची मदत संबंधित पत्रकाराच्या पत्नीला किंवा मुलांना मिळाली पाहिजे. ही रक्कम मृत्यूनंतर एक महिन्याच्या आत तातडीने दिली जावी त्यासाठी देखील आधिस्वीकृती पत्रिकेची अट नसली पाहिजे आमची सरकारला विनंती आहे की या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी ही या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या पदाधिकारी यांच्या सह्या आहेत.

पान १ वरून...

### बीड शहरातील क्लासमध्ये...

आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मी संत भगवान बाबा उच्च माध्यमिक महाविद्यालय खरवंडी कासार येथे ११ वीचे अ‍ॅडमीशन घेतले असुन एप्रील २०२४ मध्ये उमा किरण कोचिंग क्लासेस येथे नीटचे क्लासेस लावले होते. सकाळी ०९.०० ते १२.०० पर्यंत उज्वल अभ्यासिका येथे अभ्यासीका लावली होती व तेथे मी नेहमी अभ्यास करण्याकरीता जात असायचे. जुलै २०२४ पासून प्रशांत खाटोकर सर १२.०० वा.सु मी अभ्यासीकेमधुन बाहेर येण्याच्या टाईमला माझ्या अभ्यासीकेच्या खाली येवून थांबायचे व मला म्हणायचे तू माझ्यासोबत चल गाडीवर बस, तेव्हा मी त्याला नाही म्हणायचे.

क्लासेसचा टाईम दुपारी २ ते दुपारी ६ पर्यंत असायचा. मी तेथे क्लास रेग्युलर करत होते. प्रशांत खाटोकर सर जे फिजिक्स शिकवतात ते मला क्लास संपल्यानतर तेथील केबिनमध्ये एकटीला बोलवून ते माझी कीस घ्यायचे, माझ्या छातीला व गुप्त अंगाला बॅड टच करायचे. अंगावरील कपडे काढायला लावून माझे ते फोटो काढायचे. कधी कधी ते क्लास संपल्यानंतर क्लासरुम मध्ये कोणी नसताना तिथे सुध्दा ते मला किस करायचे व छातीला व इतर अंगाला बॅड टच करायचे. ते असे माझ्यासोबत वारंवार करत असायचे. मला धमकी द्यायचे की, तू जर घरी कोणाला सांगितले तर मी तुला मारुन टाकेन, अशी धमकी प्रशांत खाटोकर यांनी आपल्याला दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### जिल्हाधिकारी साहेब, तुम्ही...

जायकवाडी वसाहत पाटबंधारे विभाग शाखा क्रमांक ६ टाकरवन येथील शाखाधिकार्यांना वेळोवेळी निवेदन दिले मात्र त्या शेतकऱ्यांना पाणी मिळाले ना निवेदनाचे उत्तर मिळाले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब तुम्ही एकदा जायकवाडी विभाग पाटबंधारे यांच्या अधिकारी कर्मचाऱ्याकडे एकदा बघाच शेतकऱ्यांना नीट बोलतात ना शेतकऱ्यांचे प्रश्न नीट ऐकून घेतात असा आरोप आता टाकरवन येथील काही शेतकऱ्यांतून केला जात आहे. अशांनी गरगट अधिकाऱ्याला सरळ करण्यासाठी तुम्ही एकदा या विभागाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी बातचीत करून शेतकऱ्याचा हा प्रश्न निकाली काढा अशी मागणी देखील आता या शेतकऱ्यातून होत आहे.

**दोन एकर ला पाणी देऊ शकता मग तीस हेक्टरला का नाही.?**

पाटबंधारे विभागाच्या काही अधिकाऱ्याने जायकवाडीचा उजवा कालवा तसेच वितरिका आपल्या स्वत:ची मालकीची असल्याचे समजून काही शेतकऱ्याकडून पैसे घेऊन थेट दोन एकर ल पाणी उपलब्ध करून देण्यासाठी वितिरका खोदून त्यांना पाणी दिले. मात्र तीस हेक्टर पेक्षा अधिक शेतकरी हे ह्याच अधिकाऱ्यांना आम्हाला पाणी द्या अथवा पाणी मिळत नसल्याचे प्रमाणपत्र द्या ही मागणी करत असताना त्यांच्या मागणीकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करून त्यांना पाटबंधारे विभागाचा नियम शिकवत आहेत. अधिकारी स्वत:ज्ञान झाल्यावर घोषित आहेत आणि नंतर ते शेतकऱ्यांना नेम शिकवत आहेत. मेमाने तीस हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्राला पाणी जर पाहिजे असेल तर त्या शेतकऱ्यांनी ह्या अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करणे गरजेचे असते त्यानंतर संबंधित वितरेकेतून पाणी त्या शेतकऱ्यांना भुई दान अथवा नाली दांडातून दिले जाते मात्र हे नियम धाब्यावर बसून अधिकारी आपल्या मर्जीनुसार वितरिकेचे पाणी देत असल्याचा देखील आरोप केला जात आहे.

**आम्हाला पाणी मिळत नाही मग प्रमाणपत्र का दिले जात नाहीत.?**

पाटबंधारे विभागातील निवृत्त अधिकाऱ्यांनी काही शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जाणारे पाणी बंद कशामुळे झालेले आहेत. याकडे लक्ष दिले नसल्यामुळे आज हे शेतकरी आम्हाला पाणी देण्यात यावे अशी मागणी करत आहेत. मात्र त्या शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचण्यासाठी आता पाटबंधारे विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना अनेक समस्याला तोंड द्यावे लागणार आहे. देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली पैशाचा चुरोडा केला मात्र काम इन जे झाल्यामुळे आज ह्या शेतकऱ्यांना पाणी मिळत नसल्याचे देखील आरोप शेतकऱ्यातून होत आहे. ह्या शेतकऱ्यांना जायकवाडीच्या व्यतिरिकेतून पाणी मिळत नसल्याचे लेखी देण्यात यावी अशी मागणी केल्यानंतर अधिकाऱ्याकडून कुठलीच थांब भूमिका घेतली जात नाही. त्यामुळे ह्या शेतकऱ्यांना पाणी मिळते न शासनाच्या योजनेचा कुठला फायदा घेता येत नाही त्यामुळे शेतकरी आज मेटाकुटील आलेला आहे.

# सरकार देवस्थानांवर मेहेरबान मात्र ज्ञानमंदिर आणि आरोग्य मंदिराकडे दुर्लक्ष

## मंदिर विकासाप्रमाणेच ज्ञानमंदिर, आरोग्य मंदिरासाठीही निधी द्यावा : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील महायुती सरकार देवस्थानांवर चांगलेच मेहेरबान असुन मागील वर्षात मराठवाड्यात तीर्थक्षेत्र क आणि ब मधील ५५९ देवस्थानांच्या विकासासाठी ६२ कोटींचा खर्च होत आहे. तथापि सद्यस्थितीत ५५९ पैकी १२० कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत तर १७८ कामे अद्याप सुरू होण्याच्या प्रतिक्षेत आहेत. मंदिर विकासांची कामे होत असल्याने भाविक भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. याचवेळी देवस्थानांच्या विकासाला महत्त्व देतानाच मुलांच्या शिक्षणासाठी उपयुक्त ज्ञानमंदिरे आणि आरोग्य सुविधा पुरवणारी आरोग्य मंदिराकडे मात्र सरकारचे दुर्लक्ष होत असुन देवस्थानांच्या विकासाबरोबरच गावातील शाळा आणि आरोग्य केंद्राच्या विकासासाठी ग्रामस्थ आणि पुढाऱ्यांनी पुढाकार घ्यावा आणि सरकारने यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.



मराठवाडा संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. याठिकाणी मठ, मंदिर आणि देवस्थानांची संख्या आधिक आहे. अनेक गावात ३-४ नावाजलेली देवस्थाने आहेत. त्यांचा विकास व्हावा यासाठी संबंधित ग्रामस्थ कायम प्रयत्नशील असतात. अशाच ५५९ देवस्थानांच्या विकास कामाला सरकारने मागील वर्षी मंजुरी दिलेली आहे. मंजुरी दिल्यानंतर अनेक ठिकाणी तातडीने कामे सुरू करण्यात आली असुन यातील १२० कामे पूर्ण करण्यात आली आहेत. याठिकाणी मंदिर परीसराचे सुशोभीकरण, सभामंडप, पिण्याच्या पाण्याचा हौद, पेव्हर ब्लॉक, विद्युतीकरण अशी आवश्यकतेनुसार कामे करण्यात येत आहेत.

**देवस्थानांच्या विकासाप्रमाणेच ज्ञान मंदिर आणि आरोग्य मंदिरांचा विकासासाठी निधी द्यावा : डॉ.गणेश ढवळे**

संतांची भूमी असलेल्या मराठवाड्यात देवस्थानांची संख्या आधिक आहे. सप्ताह, यात्रा आदि कार्यक्रम होत असल्याने लोकं एकत्र येतात. गाठीभेटी होतात, विचारांची देवाणघेवाण होते. यामुळे देवस्थानांच्या विकासाला महत्त्व दिलेच पाहिजे. परंतु याचवेळी गावातील शाळांना मुलभूत सुविधा आणि आरोग्य सुविधा पुरवणाऱ्या आरोग्य केंद्रांच्या विकासासाठीही ग्रामस्थ आणि पुढाऱ्यांनी पुढाकार घेऊन शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे अशी भावना डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.

### विविध कामांची स्थिती

| जिल्हा | पुर्ण- | प्रगतीपथावर- | सुरू नसलेली- | मंजुर कामे |
|---|---|---|---|---|
| लातुर | ५७ | ६७ | ४८ | १८९ |
| बीड | २२ | २९ | ०८ | ८४ |
| संभाजीनगर | १८ | ४१ | २८ | ८७ |
| धाराशिव | ०० | ०६ | ७१ | ७७ |
| जालना | २० | १३ | ०४ | ३७ |
| परभणी | ०० | ५१ | ०० | ५१ |
| हिंगोली | ०० | ११ | ०० | ११ |
| नांदेड | ०३ | २५ | १९ | ४८ |

### नव्या सरकारकडे ढिगाने प्रस्ताव

मागील वर्षात ५५९ कामांना मंजुरी दिली होती. परंतु नव्याने सत्ता आल्यानंतर लाडकी बहिण योजनेसाठी निधी वळवल्यामुळे सरकारकडे निधीची वानवा असल्याने या वर्षात नविन मंजुरी देण्यात आली नाही. मात्र नव्याने मंजुरी मिळावी यासाठी मागील वर्षापेक्षा जास्त प्रस्ताव शासनाकडे आल्याची माहिती असुन शासनाकडे ढीगभर प्रस्ताव दाखल झाले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी त्यापैकी अनेक कामांना मंजुरी मिळण्याची शक्यता असुन त्यासाठी स्थानिक नेते मंडळी जोर लाऊन प्रयत्न करत आहेत.

### ४२ टक्के निधी झाला खर्च

तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत ३ वर्ग क साठी ३९२४.७२ लाख रुपये तर ४ ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमासाठी २३९४.२९ लाख रूपयांचा निधी मंजूर असुन आतापर्यंत यातील ४२ टक्के निधी खर्च झालेला आहे.उपलब्ध उर्वरित निधी अखर्चित राहिल्याने तो शासनाकडे परत गेला तरी तो पुन्हा उपलब्ध होत आहे.

---

# आवरगाव-हसनाबाद ग्रामपंचायत च्या उपसरपंचपदी नवनाथ नखाते यांची निवड

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील आदर्श असणाऱ्या आवरगाव हसनाबाद येथील ग्रामपंचायतची उपसरपंच निवड ही प्रक्रिया दिनांक २५ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालय आवरगाव येथे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी राऊत यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.



आवरगाव हसनाबाद ग्रामपंचायतची निवडणूक ही काल २५ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालय आवरगाव या ठिकाणी संपन्न झाली या निवडणुकीत सर्व सदस्यांपैकी नवनाथ शेषराव नखाते यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. गेल्या अडीच वर्षापासून आवरगाव - हसनाबाद ग्रामपंचायत उपसरपंच म्हणून गंगुताई शिवाजी सोळंके या उपसरपंच होत्या व त्यानंतर आता अडीच वर्ष नवनाथ शेषराव नकाते हे उपसरपंच म्हणून कार्य करणार आहेत या बिनविरोध निवडीबद्दल सरपंच अमोल जगताप यांच्यासह सर्व सदस्य व नागरिक मित्रपरिवार मित्रपरिवार यांनी नवनाथ नखाते यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

---



# बेलखंडी पाटोदा विद्यालयाच्या वतीने वारकऱ्यांना छत्र्या, रेनकोट वाटप

नवगण राजुरी । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचा पायी दिंडी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान झाला. दिंडीतील वारकऱ्यांना बेलखंडी पाटोदा विद्यालयाच्या वतीने रेनकोट आणि छत्र्या वाटप करण्यात आल्या.

गुरूवार दि.२६ रोजी बेलखंडी पाटोदा येथे श्री क्षेत्र नारायण गडाच्या पायी दिंडी सोहळ्याचे आगमन होताच प्राचार्य धनवंत मस्के यांनी दिंडी सोहळ्याचे पुष्पहार अर्पण करून यथोचित असे स्वागत केले तसेच येणाऱ्या भाविक भक्तांना पावसाळी वातावरणामध्ये त्रास होऊ नये, म्हणून छत्र्या आणि रेनकोट वाटप करून दिंडीतील सर्व वारकऱ्यांना चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व परिसरातील ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

---

# उच्च माध्यमिक विद्यालय फुलसांगवी येथे छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

आज विद्यालयात सामाजिक समतेचे प्रतिमान समजले जाणारे छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली व समाज सुधारक म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला. मुख्य अतिथि म्हणून लाभलेले मान्यवर समाजसेवी श्री.भागवतराव उगले यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले व विद्यालयाचे प्राचार्य श्री.मस्के सर, प्राध्यापक वृंद, इयत्ता १२ वी वर्गातील विद्यार्थी आणि पालक प्रतिनिधी यांनी सामुहिक अभिवादन केले.

संवेदनशील, विचारशील आणि न्यायप्रिय शासक म्हणून शाहू महाराज यांचे जीवन कार्य व तत्त्वज्ञान यावर श्री.भागवतराव उगले यांनी प्रकाश टाकला. शाहू महाराजांनी सामाजिक बदलावर तसेच शिक्षण प्रसारावर वर्चस्व ठेवले. त्यांनी जातीभेद मिटवून सर्वांसाठी समान संधी निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असे त्यांनी अधोरेखित केले. विद्यालयाचे



प्राचार्य श्री. संदीप मस्के सर म्हणाले, शाहू महाराजांनी ज्या 'समता, बंधुता आणि न्याय' या मूल्यांना प्रोत्साहन दिले त्याची आज आपल्याला जादा गरज आहे. खास करून शिक्षण क्षेत्रात त्यांचे योगदान विद्यार्थी आणि शिक्षकांनी जाणून घेतले पाहिजे. श्री.उजगरे सर, श्री.मगर सर, श्री.रत्नपारखे सर, यांनी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांचे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन श्री. श्याम इंगले यांनी उत्तम केले होते.

---

# मातंग समाज कृती समिती सोलापूर यांचा बहुजन समाजातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

जी गोष्ट समाजाच्या हिताची आहे त्यावर लक्ष केंद्रित करा आम्ही समाज माध्यमांवर लढत आहोत. सर्व प्रकारच्या स्टेटस ने जीवना मध्ये पुढे जायचं असेल तर एकच मार्ग आहे ते म्हणजे शिक्षण. तुमचा वेळ शिक्षणावर केंद्रित करा शिक्षणाच्या दिशेने वाटचाल केल्यास यश नक्की मिळेल डॉल्बी समोर नाचून शक्ती प्रदर्शन करण्यापेक्षा आपल्या समाजामध्ये किती डॉक्टर, वकील इंजिनियर, प्राध्यापक किती आहेत व भविष्यात जास्त कसे करता येईल हे समाजाचे खरे शक्ती प्रदर्शन आहे, असे प्रतिपादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सोलापूर आयुक्त एम राजकुमार यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सहाय्यक आयुक्त सामाजिक न्याय विभाग सुलोचना सोनवणे या बोलताना म्हणाल्या की, ग्रामीण मधून आलेली आहे दूरदृष्टी ठेवून अभ्यास करा इच्छाशक्ती मधूनच माणूस घडत असतो स्पर्धा परीक्षेची तयारी करा असे विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून मातंग समाज कृती समिती शहर जिल्हा सोलापूर यांच्या वतीने १० वी १२ वी व तत्सम परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा समाजकल्याण केंद्र रणभवन चौक सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता.

विशेष सत्कार चझडउ स्पर्धा परीक्षेत मुलींमध्ये महाराष्ट्रात प्रथम आलेली कु वैष्णवी राम गायकवाड सिंगापूर येथे झालेल्या एशिया कप २०२५ भारताकडून



या स्पर्धेत भाग घेऊन धनुर विद्या या खेळाच्या प्रकारात रौप्य पदक मिळवलेली कु तनिष्का निलकुमार ठोकळ पती निधनानंतर आलेल्या अडचणीला सामोरे जाऊन आणि कोणत्याही विरोधाला न जुमानता शिक्षण घेऊन पदवीधर होऊन स्वयं कर्तुत्वाचा ठसा उमटविणारी श्रीमती विजया महालिंग महापुरे रत्नागिरी येथे झालेल्या महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग २०२५ या क्रिकेट स्पर्धेमध्ये भाग घेऊन सोलापूरचे नाव उज्वल करणारी कु नंदिनी अशोक सोनवणे पोलीस बंदोबस्ताची व्यस्त ड्युटी करत करत अभ्यास करून कायद्याचे पदवी मिळवली सोलापूर शहर आयुक्तालयातील संलग्न जेल रोड पोलीस स्टेशनचे कर्मचारी पोलीस संतोष सुधाकर वायदंडे झोपडपट्टी परिसरात राहून हालाकीच्या परिस्थितीचा सामना करत शिक्षण घेऊन कायद्याची पदवी मिळवनारे उमेश पवार (पंढरपूर) या सर्वांनी यश संपादन केल्याबद्दल त्यांना शॉल, पुष्प =ह्लव भारतीय संविधानाची उद्देशिका =द्ध देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच बहुजनातील १० वी १२ वी उत्तीर्ण झालेल्या ७५ विद्यार्थ्यांचा डिक्शनरी, भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव असल्याने संविधानाची उद्देशिका =द्ध व पुष्प =ह्लदेऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी अध्यक्ष युवराज पवार, रमेश बोराडे, राजू क्षीरसागर, श्रीकांत देडे, रवी शैलेश पोटफोडे, प्रभाकर कांबळे, बालाजी खंदारे, विश्ववेंद्र मोरे, शशांक कांबळे, शिवाजी गायकवाड, शिरा आडगळे, दिलीप कांबळे, विश्ववेंद्र मोरे, शशी डोलारे, मसू रणदिवे, विकी पवार, ज्योतिबा पारखे, महेश जाधव, महेश भालेराव, प्रशांत पाटोळे व विद्यार्थ्यांचे पालक आणि समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

---

# १६ वर्षापासून चोपडा पायी दिंडीला पंगत देण्याची भगीरथ धारक यांची परंपरा

कडा । प्रतिनिधी

आष्टी तहसिल कार्यालयतील अव्वल कारकुन (शासन) भगीरथ धारक हे गेली १६ वर्षापासून खानदेश जळगाव जिल्ह्यातुन पंढरीला पायी जाणा-या दिंडीला अन्नदान पंगत देतात. काल बुधवर दि.२५ जुन रोजी दुपारची पंगत आष्टी शहरात धारक परिवाराने दिली. दिंडीतील ७० वारकरी व गल्लीतील १०० भावीक उपस्थित होते. आषाढी एकादशीच्या निमित्ताने राज्यातील लाखो वारकरी आपापल्या भागातील दिंड्यामधून पांडुरंगाच्या चरणी लीन होण्यासाठी येतात. चोपडा ते पंढरपूर हा दिंडी सोहळा मार्गस्थ आहे. संतांनी आयुष्यभर सर्वसामान्य माणसाला माणुसकीचा धर्म शिकवला. भक्तीचे महत्त्व सांगून समता, बंधुत्व, ऐक्य आणि सर्वधर्म



समभावाची शिकवण दिली आहे असे प्रवचनात तांदळे महाराज म्हणाले.

यावेळी स्टेट बँक आफ इंडियाचे शाखाधिकारी राकेश साई, पत्रकार उत्तम बोडखे, दिलीपराव काळे, भगीरथ धारक यांचे भाषणे झाली. यावेळी प्रविण पोकळे, शरद रेडेकर, आण्णासाहेब साबळे, राजेंद्र लाड, बनकर सर आदि मान्यवर उपस्थित होते. श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज पंढरपूर यांचे फडावरील पायी दिंडी सोहळाश्री क्षेत्र चोपडा ते श्री क्षेत्र पंढरपूर वै.ह.भ.प.गोविंद महाराज यांचे पदस्पर्शाने पुनीत क्षेत्र चोपडा येथून श्री गुरु केशव महाराज नामदास संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे वंशज यांच्या कृपाशिर्वादाने पांडुरंग परमात्म्याचे दर्शनासाठी पंढरपूर येथे जाणारा पायी दिंडी सोहळा आहे.

शनिवार दि. ७ जुन २०२०५ रोजी सकाळी चोपडा येथून दिंडी निघून १ जुलै रोजी पंढरपूरला पोहचणार आहे. श्री संत श्रावणबाबा विटनेर व वै.मोठे बाबा आळंदी, श्री. केशव महाराज, पंढरपूर, श्री. ह.भ.प.वै.माधव महाराज, महंत सुशिल महाराज विटनेर, श्री.ह.भ.प.विजय मोहन देवरे, श्री.ह.भ.प.शाम रामचंद्र लोहार, ह.भ.प.सौ.निता देवरे, ह.भ.प.तेजस महाराज उपस्थित होते.

---

# शनिवारी सुरुडी येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात होणार जपानी भाषा वर्गाचे उद्घाटन






आष्टी । प्रतिनिधी

इंजा फाउंडेशनच्या आणि कॉसमो इन्स्ट्रुमेंट इंडिया प्रिव्हेट लिमिटेड यांच्या वतीने स्वामी विवेकानंद विद्यालय, सुरूडी, तालुका - आष्टी, जिल्हा - बीड येथे घेऊन आलो आहोत मोफत जापनीज भाषा वर्ग. जपान हे जगातील सर्वात प्रगत देशांपैकी एक आहे, त्यामुळं ही भाषा शिकणं ही एक संधी आहे, आमचा उद्देश आपल्या परिसरातील मुलांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे.

त्यासाठी इंजा फाउंडेशन यांच्या मार्फत सुरूडी गावात दिनांक २८ जून रोजी दुपारी २:३० वाजता जापनीज वर्गाचे लोकार्पण करत आहे. त्यानंतर लगेचच आपण ऑनलाइन जापनीज क्लासेसची सुरुवात करणार आहोत. यासाठी इंजा फाउंडेशनचे संचालक नामदेव सारुक आणि कॉस्मो कंपनीचे संचालक रामकुमार बस्नेत यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोस्मो जपान वरून श्री. ह्योदो रयोता (ऊन्नह्व् कॉसमो जपान), श्री.रामकुमार बस्नेत (संचालक - कॉसमो इन्स्ट्रुमेंट इंडिया प्रिव्हेट लिमिटेड), श्री.भरत गिते (चऊ आणि उएज टॉरल इंडिया) आणि श्री.रावसाहेब घुगे (उएज - द बाप कंपनी) यांचे मार्गदर्शन आपल्याला लाभणार आहे. आष्टी तालुक्यातील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा.

---

# बहुजन हिताय बहुजन सुखाय असा राज्यकारभार करणारे रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज सदा सर्वकाळ वंदनीय आहेत : संतोष डोंगरे

**धम्मदीप बुद्ध विहार व वाचाल तर वाचनालयातर्फे विविध उपक्रम संपन्न करून छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन**

बीड । प्रतिनिधी

बहुजनांचा उद्धार शिक्षणाशिवाय होणार नाही हे विद्या विना मती गेली...' हे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या थोर विचारांची आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे व बहुजन हिताय बहुजन सुखाय या मूलमंत्र्यानुसार राज्यकारभार करणारे रयतेचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज सदा सर्वकाळ वंदनीय आहेत, असे उद्गार सुप्रसिद्ध कीर्तनकार व संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे गाढे अभ्यासक प्रमुख वक्ते श्री संतोष डोंगरे सर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना संबोधितांना प्रतिपादन केले.

धम्मदीप बुद्ध विहार बीड येथे बुद्ध विहार कमिटी, वाचाल तर वाचाल वाचनालयातर्फे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विनम्र अभिवादन कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जीएम भोले सर हे होते तर ह.भ.प. श्रीकृष्ण उबाळे सर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. या कार्यक्रमास



वाचाल तर वाचालचे संस्थापक अध्यक्ष डी.जी. वानखेडे, समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, आयु. बी.जी. दळवी, डी.एम. राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम तथागत, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले, ॲड तेजस वडमारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक करून बुद्ध विहारे हे संस्कार केंद्र व्हावीत या दिशेने पुढील वाटचाल राहील असे निर्धारपूर्वक सांगितले.

वरील निर्धारचाच एक भाग म्हणून वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाने बलभीम नगर परिसरातील १२ गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) व छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, माता रमाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, संत गाडगेबाबा थोर शास्त्रज्ञ डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवन चरित्र पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला तर वाचनालयाचे केंद्र असलेल्या ३८ वे केंद्र असलेले धम्मदीप बुद्ध विहार परिसरातील विद्यार्थ्यांकरीता ४ थ्या फेरीतील ५० पुस्तकांचा संच ३ महिने वाचनाकरिता ॲड तेजस वडमारे यांना मान्यवरांच्या हस्ते मुलांना वितरित करण्याकरिता सुपूर्द करण्यात आला.

नवनिर्वाचित नौकरिस रुजू झालेले सय्यद शबनम रफिक व अभिजित सिरसाट यांचा पेन महापुरुषांचे जीवन चरित्र पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन धम्मदीप बुद्ध विहार व वाचनालयातर्फे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी छोटी बालिका तनिष्का वाघमारे हिने बाबासाहेबांच्या जीवनावर मंत्रमुग्ध करणारे सुरेल आवाजात गीत गायले याबद्दल अध्यक्ष जीएम भोले यांनी तिला ५० रुपये बक्षीस देऊन पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या. या सत्कार प्रसंगी नवनियुक्तांनी आपले मनोगत व्यक्त करून आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून चिकाटीने अभ्यास केल्यास यश नक्की मिळते असे भाओद्गार काढले. प्रमुख पाहुणे ह.भ.प. श्रीकृष्ण उबाळे महाराज यांनी छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांच्या जीवनात बहुजन हिताकरिता केलेल्या अनेक कार्यावर सखोल प्रकाश टाकून महाराजांच्या जीवनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सध्या स्थिती जीवनाची वाटचाल ठेवणे हेच त्यांना जयंतीदिनी खरे विनम्र अभिवादन ठरेल असे स्पष्ट केले या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन निळकंठ (केके) वडमारे यांनी केले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व उपस्थित ४० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) व खाऊ वाटप केले. या कार्यक्रमास आयु.राज जाधव, प्रेम जोगदंड, यश गवळी, सरिता खेमाडे, कोमल वाघमारे, अंजली वडमारे व बलभीम नगर, शिवाजीनगर, मित्र नगर, पंचशील नगर, परिसरातील बालक बालिका व उपासक उपासिका मोठया संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# प्रशासक मुख्याधिकारी साहेब लक्ष द्या अन्यथा शहरातील स्वच्छतेची वाट लागेल?

## धारूर नगरपरिषदेला स्वच्छतेचा विसर ; नागरिकांच्या आरोग्यास धोका

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर नगरपरिषद प्रशासनाच्या धिम्या कारभाराला धारूरकर वैतागले असून अनेक रोज नव्याने समस्या उद्भवत असल्या तरी आहे त्याच समस्या सोडवण्यात धारूर नगरपरिषद प्रशासन पूर्णपणे दुर्लक्ष करीत असल्याचं दिसत आहे

सध्या पावसाळ्याचे दिवस चालू झाले असून पावसामुळे शहरातील गल्लोगल्लीत अनेक महिन्यापासून नाल्या तुडूंब भरून गच्च नालीतले घाण पाणी रस्त्यावर शहरातल्या अनेक भागात येत आहे. मागच्या काही दिवसापूर्वी पडलेल्या अवकाळी पावसामुळे नालीतल्या घाण पाण्यामुळे व अनेक ठिकाणी साचलेल्या कचऱ्याच्या ढिगरामुळे शहरात दुर्गंधी पसरली आहे या संपूर्ण प्रकाराकडे किल्ले धारूर नगरपरिषदेचे दुर्लक्ष असल्याचे




दिसून येत आहे.

स्वच्छ धारूर सुंदर धारूर नावालाच का ? असा प्रश्न चिन्ह नागरिक उपस्थित करत आहेत. याच स्वच्छतेच्या नावे अनेक योजना, अभियान असले तरी किल्ले धारूर नगरपरिषद त्याच योजनां पाण्यात घालण्याचे काम करताना दिसत आहे. या पसरलेला दुर्गंधीला स्वच्छ करण्यासाठी नगरपरिषदेला अनेक वेळा शहरातल्या नागरिकांनी सांगून सुद्धा जैसे है वैसा चे चित्र ठिकठिकाणी दिसत आहे. त्याच दुर्गंधीमुळे रोगराई पसरून डेंगू, मलेरिया सारखे अनेक आजार होण्याचे लक्षणे दिसत आहेत मागच्या काही वर्षांपूर्वी ही नगरपरिषदेच्या भोंगळ कारभारामुळे शहरातल्या अनेक निष्पाप नागरिकांना डेंग्यू मुळे व ईतर रोगराई मुळे आपला जीव गमावा लागला तरीही याही वर्षी तेच चित्र पुन्हा उद्भवणार का ? असे अनेका-नेक प्रश्न उपस्थित होत आहेत नेमके किल्ले धारूर नगरपरिषदेला पसरलेली दुर्गंधी आहे तशीच ठेवून काय सिद्ध करायचे हे ही कळायला मार्ग नाही.

### प्रशासनाच्या टेंडर नुसार दर पंधरा दिवसाला नाली काढणे ? तरीही पसरलेल्या दुर्गंधीकडे मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष

किल्ले धारूर नगरपरिषद स्वच्छतेच्या कारभाराचा अखेर फाटला बुरखा आहे. पसरलेल्या दुर्गंधीमुळे किल्ले धारूर नगरपरिषदेचा कारभार चव्हाट्यावर आला असून किल्ले धारूर नगरपरिषद प्रशासनाच्या स्वच्छतेच्या बाबतीत अधिकची माहिती अशी की स्वच्छता करण्यासाठी शासनाच्या टेंडर नुसार शहरातली दर पंधरा दिवसाला टेंडर प्रमाणे नाली काढण्याचे आदेश असल्याचं बोलले जात आहे. परंतु या टेंडर प्रमाणे स्वच्छता तर होतच नाही तर शहरातल्या काही भागात अनेक महिन्यापासून नाल्याच काढल्या नसल्याचं शहरातले नागरिक सांगत आहेत. या संपूर्ण प्रकाराकडे जाणीवपूर्वक मुख्याधिकारी महेश गायकवाड यांचे दुर्लक्ष आहे की काय ? अशी चर्चा मात्र मोठ्या प्रमाणात शहरात होऊ लागले आहे. १) होत नसलेले कामे टेंडर प्रमाणे यामुळे शासनाची फसवणूक तर होत नाही ? तर २) स्वच्छतेच्या नावे लाखो रुपयांचे बिल उचलून भ्रष्टाचार तर झाला नाही ? अशे अनेका प्रश्न उपस्थित होत आहे. तरी या बाबींकडे वेळीच मुख्याधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# धोकादायक इमारतीत काळजावर दगड ठेऊन अधिकारी, कर्मचाऱ्यांचे काम!

## दीड कोटीची इमारत मंजूर, पण होणार कधी?

आष्टी । प्रतिनिधी

जीर्ण झालेली इमारत राहण्यायोग्य नसल्याने फक्त तपासणी व गोळ्या औषध मिळेल एवढीच सुविधा त्यामुळे एक दोन नव्हे तर तब्बल ९ वर्षापासून प्रशासनाच्या दुर्लक्ष पणामुळे ना शस्त्रक्रिया ना प्रस्तुती होत नसल्याने महिलांना इतरत्र असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जाण्याची वेळ आली आहे. तर अधिकारी, कर्मचाऱ्यांना काळजावर दगड देऊन काम करावे लागत आहे. अनेक महिन्यांपासून दीड कोटीची नवीन इमारत मंजूर झाल्याचे बोलले जाते. पण ती होणार कधी? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत आठ प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहेत. तर ४० हजार लोकसंख्या व एक वैद्यकीय अधिकारी १९ कर्मचारी असलेले हे प्राथमिक आरोग्य केंद्र २०१५ पासुन याठिकाणी असलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण झाल्याने आणि सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना ज्या सुविधा दिल्या जातात त्या मिळत नाहीत. कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया होत नाहीत कि प्रस्तुती देखील केली जात नाही. नाईलाजाने महिलांना कडा, धामणगाव असा लांबणीचा प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे महिलांना मोठ्या प्रमाणावर मनस्ताप सहन करावा




लागतो. अनेक वेळा पाठपुरावा करून देखील वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी याकडे कानाडोळा करीत आहेत. याचा तोटा या प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत येणाऱ्या गावातील महिलांना सहन करावा लागत आहे. या ठिकाणी नवीन सुसज्ज अशी इमारत उभी करून वर्षानुवर्ष होत असलेली गैरसोय दुर करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर घोडके यांनी उपोषण, त्याच बरोबर लेखी पाठपुरावा करून हा प्रश्न लावून धरल्यानंतर प्रशासनाने दखल घेऊन दीड कोटीची इमारत मंजूर केली. पण प्रत्यक्षात ती होणार कधी?हा मोठा प्रश्न आहे.

इमारत राहण्यायोग्य नसताना देखील केला. दुरूस्ती साठी लाखोंचा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ही इमारत धोकादायक आणि राहण्यायोग्य नसल्याचे वरिष्ठ अधिकारी यांना कळवले असुन देखील आरोग्य विभागाने वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून आज पर्यंत लाखो रूपये खर्च का केला. हे मात्र समजले नाही. वर्षापुर्वी बैठकीदरम्यान पडला होता स्लॅब पापुडदा वर्षापुर्वी आशा सेविकांची बैठक आयोजित केली होती. बैठक सुरू असताना अचानक स्लॅबचा पापुडदा पडला. सुदैवाने कसलीच हानी झाली नाही. नशिब बलवत्तर म्हणत धावपळ झाली होती. एवढी गंभीर घटना घडून देखील आजही याच ठिकाणी बैठक घेतली जाते.

### मला न्याय देण्यात यावा देशमुख यांची मागणी; लऊळ गावातील धक्कादायक प्रकार

# नवऱ्याचे पैसे घेऊन पत्नी फरार, पत्नी व सासूकडून प्रवीण देशमुख यांना मानसिक त्रास

बीड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील लऊळ या गावांमध्ये, प्रवीण वसंतराव देशमुख या युवकाचा विवाह सोहळा गेल्या सहा वर्षांपूर्वी झालेला आहे. यावेळी त्यांच्या पत्नी कल्पना राजाराम तनपुरे या सातत्याने आपल्या पत्नीला वारंवार पैशाची मागणी करत होत्या. कल्पना तनपुरे यांच्या आई गंगुबाई राजाराम तनपुरे या सुद्धा या आपल्या जाव्याकडे वारंवार पैशाची मागणी करत होत्या व जावयाला मानसिक त्रास देण्याचे काम त्या ठिकाणी केलं जात होत. आतापर्यंत प्रवीण देशमुख यांनी त्यांच्या सासूबाई गंगुबाई राजाराम तनपुरे यांना आतापर्यंत सहा लाख रुपये दिले आहेत व गेल्या काही दिवसांपूर्वी त्यांच्या पत्नी



यांनी यांच्याकडे पैशाची मागणी केली होती. यावेळी प्रवीण देशमुख हे चाकरवाडी मध्ये शिवपुराण कथेसाठी गेले असता यावेळी घरात कोणी नसताना यावेळी त्यांच्या पत्नी यांनी घरातील साहित्य संसार उपयोगी साहित्य व घरातील ७५ हजार रुपये घेऊन त्या आपल्या माहेरी जिंतूर या ठिकाणी गेल्या. प्रवीण देशमुख हे चाकरवाडी या ठिकाणी आपल्या गावी आले असता त्यांना घरामध्ये काही वस्तू नसल्याचे आढळून आले आहे. प्रवीण देशमुख यांच्या पत्नी गेल्या दोन ते तीन दिवसांपूर्वी पैसे घेऊन फरार झाले आहेत. या संदर्भात प्रवीण देशमुख यांनी पोलीस स्टेशनकडे कंप्लेंट केली आहे. वारंवार माझ्यावर अन्याय होत आहे. मला मानसिक त्रास देऊन ब्लॅकमेल करण्याचे काम या मायलेकी करत आहे मला खूप मानसिक त्रास होत आहे. मी खूप पैसे यांना दिलेले आहेत, मला न्याय देण्यात यावा अशी मागणी प्रवीण देशमुख यांनी केली आहे.

# धारूर घाटात अपघाताची मालिका सुरूच; खाद्यतेल घेऊन जाणारा टँकर पलटी

धारूर । प्रतिनिधी

दोन दिवसांपूर्वी चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार ३०० फूट दरीत कोसळलेली घटना ताजीच असताना गुरुवार रोजी दुपारी धारूर हून माजलगाव कडे तेल घेऊन जाणारा टँकर क्रमांक एम एच ४३ बीजी ६८ २२ या टँकरचे धारूर घाटात आल्यानंतर ब्रेक निकामी झाले.

ब्रेक निकामी झाल्याची समजतात चालकाने प्रसंगावधान राखून टँकर डोंगराच्या कडेला घेऊन थांबवण्याचा प्रयत्न केला असता तो टँकर पलटी झाला यात चालक गंभीर जखमी झाला असून टँकर मधील खाद्यतेल रस्त्यावर सर्व दूर पसरले होते या अपघातामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती धारूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना घेऊन वाहतूक सुरळीत केली.





## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना हा सन्मान की अपमान : आझाद क्रांती सेना

केज । प्रतिनिधी

थोर साहित्यिक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने मातंग समाजातील (व तत्सम १२ पोटजातीतील) विद्यार्थी जे दहावी, बारावी, पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमात किंवा अभियांत्रिकी व वैद्यकीय परीक्षेत ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवतात, त्यांना दहावीसाठी १०००रू, बारावी १५००रू, पदवी व पदविका २०००रू, अभियंतिकी व वैद्यकीयसाठी २५०० रू, शिष्यवृत्ती देण्यात येते, ही शिष्यवृत्ती वाढवून ५० हजार ते एक लाख रुपयांपर्यंत वाढवावी, या प्रमुख मागणीसह आझाद क्रांती सेना केज यांनी २७/०६/२०२५ रोजी तहसीलदार मा.राजेश गिड्डे साहेबांना निवेदन देण्यात आले.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाला मुबलक निधी उपलब्ध करून देण्यात यावा. तूटपूंजा निधी देऊन हा गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान नसून अपमान आहे. त्यामुळे या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान व्हावा याच मागणीसह आझाद क्रांती सेना तालुका अध्यक्ष शरद थोरात, शहरप्रमुख इरफान पठाण, मार्गदर्शक बाबुराव गालफाडे सर, दलित महासंघाचे तालुकाध्यक्ष विनायक लोंढे, रावण गालफाडे, मोहन पोळ, इत्यादींच्या उपस्थितीत केज तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

# सोलापूरवाडी येथे शासकीय कृषी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी प्रयत्न करू : आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

सोलापूर वाडी येथे माळरानावरील कोरडवाहू जमिनीमध्ये सेंद्रिय खते आणि नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत प्रयत्नांची पराकाष्ठा करून फळबाग फुलवलेल्या इन्फॉर्मेशन अँड टेक्नॉलॉजी या विषयातील इंजिनीयर हनुमंत लक्ष्मण गावडे यांना महाराष्ट्र शासनाचा वसंततराव नाईक कृषी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आमदार सुरेश धस आणि सौभाग्यवती प्राजक्ता धस यांनी सोलापूर वाडी येथे जाऊन त्यांचा सपत्नीक सत्कार केला. त्याप्रसंगी त्यांनी हनुमंत गावडे यांनी नवीन तंत्रज्ञान आणि ऑरगॅनिक पद्धतीचे पीएम बायोटेक या प्रॉडक्ट्सद्वारे विक्रमी उत्पादन घेऊन ड्रॅगन फ्रुट सफरचंद आणि सीताफळ या फळ पिकांचे विक्रमी उत्पादन घेतले घेतले आहे. या तंत्रज्ञानाचा तालुक्यातील इतर प्रगतिशील शेतकऱ्यांनी प्रेरणा घेऊन त्यांना उत्तम पद्धतीचे प्रशिक्षण देण्यासाठी सोलापूर वाडी येथे शासकीय कृषी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही आमदार सुरेश धस यांनी दिली.

यावेळी आ.सुरेश धस आणि त्यांच्या सौभाग्यवती प्राजक्ता धस यांनी या फळबागेमध्ये जाऊन ड्रॅगन फ्रुट च्या तोडणी शुभारंभ केला. यावेळी परिसरातील



शेतकऱ्यांचा परिसंवाद मेळावा घेऊन हनुमंत गावडे यांनी कोरडवाहू असलेल्या शेतीवर शेततळे तयार करून कमी पाण्यावर नवीन तंत्रज्ञान आणि ऑरगॅनिक पद्धतीचे पीएम बायोटेक चे प्रॉडक्ट असलेले खते वापरून सर्वसाधारणपणे ड्रॅगन फ्रुट आणि सफरचंद यांचे मागील वर्षीपेक्षा पाचपट उत्पन्न घेतल्यामुळे या नवीन तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना व्हावी यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करू अशी ग्वाही आमदार सुरेश धस यांनी दिली आणि शेतकऱ्यांना संबोधित करताना आधुनिक व तांत्रिक शेतीची कास धरून प्रगतीचा मार्ग कसा साधावा याचे उदाहरण म्हणजे हनुमंत गावडे असून त्यांच्याकडून नवीन शेतकऱ्यांनी आदर्श आणि प्रेरणा घ्यावी असे आवाहन करताना त्यांनी सेंद्रिय शेती ही एक काळाची गरज असून मानवी आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सेंद्रिय शेतीकडे सर्वांनी वळले पाहिजे, आणि त्यातून दर्जेदार उत्पन्नाची शाश्वती निर्माण केली पाहिजे याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित केले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी गोरक्ष तरटे यांनी सेंद्रिय शेती कशी करावी? व त्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रॉडक्ट शेतीमध्ये वापरावेत जेणेकरून शेतीचा ऑरगॅनिक कर्ब आणि एनपीके चा बॅलन्स साधला जाईल, याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पीएम बायोटेक प्रॉडक्ट्स व्यवस्थापकीय संचालक महेश माने यांनी पीएम बायोटेकच्या प्रॉडक्ट्स ची सविस्तर माहिती देऊन ऑरगॅनिक खते वापरल्यामुळे फळांचा आकार आणि वजन वाढते आणि बाजारामध्ये टिकून राहण्याचे तंत्र आणि गुणवत्ता याची माहिती दिली.

याप्रसंगी हनुमंत गावडे यांनी सत्काराला उत्तर देताना शेती हा एक सर्वात मोठा व्यवसाय आहे, असे सांगत एक एकर ड्रॅगन मध्ये वीस लाख रुपये चे उत्पन्न कसे मिळवले? याची तांत्रिक माहिती दिली. यावेळी महाराष्ट्र राज्य दूध सहकारी महासंघ महानंद मुंबईच्या संचालिका प्राजक्ताताई धस, तालुका कृषी अधिकारी श्री गोरख तरटे, पीएम बायोटेक चे व्यवस्थापकीय संचालक महेश माने, माऊली जरांगे, मंडळ कृषी अधिकारी प्रमोद कुडाळे, धानोरा मंडळातील सर्वच कृषी सहाय्यक श्री गौतम आजबे, दवागव्हाणे, रावसाहेब भस्मे, महेबूब फौजी बाळासाहेब थोरवे, सुनील थोरवे, योगेश शेळके सरपंच सुंबेवाडी, राजू खुरांगे सरपंच धनगरवाडी, राजू अल्हाडे बाळेवाडी, रामदास शेंडगे, मल्हारी थोरवे, राहूल काकडे, नवनाथ जगताप, बाबासाहेब मुठे, बबन गाडे, आजिनाथ गव्हाणे, अशोक थोरवे उपसरपंच सोलापूर वाडी, भास्कर घोडे, प्रमोद थोरवे, दत्तात्रय थोरवे यांचेसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते प्रस्ताविक व आभार शिरीष भाऊ थोरवे यांनी केले.

### पीएम बायोटेक या ऑगनिक प्रॉडक्ट्समुळे उत्पादनात प्रचंड वाढ

ड्रॅगन फ्रुट च्या बागेमध्ये पूर्णपणे पीएम बायोटेक ची ऑरगॅनिक पद्धतीची खते गेल्या दोन वर्षापासून वापरत असल्यामुळे दर्जेदार उत्पन्न मिळत असून बागेवर कोणत्याही प्रकारचा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत नाही आणि कोणत्याही रासायनिक खतांचा वापर केलेला नाही. त्यामुळे या फळांना ग्राहकांची पसंती असून पीएम बायोटेक कंपनीच्या खतांमुळे ड्रॅगन फ्रुट चे एकरी उत्पन्न २० ते २५ टनापर्यंत जाईल अशी स्थिती आहे तसेच या ऑगनिक प्रॉडक्ट मुळे फळांचा आकार देखील वाढला असून ७०० ग्रॅम ते ०१ किलो पर्यंत एका फळाचे वजन वाढल्याचे दिसून येत आहे तसेच फळावर चकाकी आणि ताजेपणा स्पष्ट दिसून येत असल्यामुळे ग्राहकाच्या पसंतीस उतरत आहेत.

– **हनुमंत गावडे,** प्रगतीशील शेतकरी, सोलापूरवाडी ता.आष्टी जि.बीड

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT